जिल्हा परिषद शिक्षक भरती.

महाराष्ट्र शासन
ग्राम विकास विभाग
शासन परिपत्रक क्रमांकः जिपब ४८१९/प्र.क्र. २०१/ आस्था १४
२१ मर्झबान पथ, फोर्ट
मंत्रालय, मुंबई ४०० ००१
दिनांक: २५ /०२/२०१९

वाचा : शालेय शिक्षण व क्रिडा विभागाचे पत्र क्र. संकिर्ण २०१८/प्र.क्र.३९०/टिएनटी १, दि. २२ फेब्रुवारी, २०१९,

<u>प्रस्तावना :-</u>

राज्यातील जिल्हा परिषद शिक्षकांची पवित्र प्रणालीमार्फत भरतीची कार्यवाही करताना, शालेय शिक्षण व क्रिडा विभागाने संदर्भाधीन क्र. संकिर्ण २०१८/प्र.क्र.३९०/टिएनटी १, दिनांक २० फेब्रुवारी, २०१९ च्या पत्रान्वये आयुक्त (शिक्षण), यांना सूचना दिल्या आहेत. सदर सूचनांसनुसरुन जिल्हा परिषद शिक्षकांच्या भरतीसदंर्भात कार्यवाही करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

२. राज्यातील जिल्हा परिषद शिक्षकांची निवड प्रक्रिया शालेय शिक्षण विभागामार्फत पर्यायाने आयुक्त शालेय शिक्षण यांच्यामार्फत केली जाते. शासनाने दिलेल्या धोरणात्मक आदेशानूसार ज्या शिक्षकांच्या कडे अर्हता प्राप्त झालेली आहे, अशा शिक्षकांच्या प्रवर्गनिहाय याद्या, संबंधित जिल्हा परिषदांच्या मागणीनूसार, त्या त्या जिल्हा परिषदांकडे सुपुर्द केल्या जातात. शिक्षकांची निवड प्रक्रिया ही पूर्णपणे आयुक्त, शिक्षण यांच्यामार्फत केली जाते. राज्यातील जिल्हा परिषदेच्या शिक्षकांची नियुक्ती जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यामार्फत केली जाते.

३ महाराष्ट्र जिल्हा परिषदा, जिल्हा सेवा नियम १९६७ नूसार शिक्षकांच्या नियुक्तीचे संपूर्ण अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी यांना आहेत. महाराष्ट्र जिल्हा परिषदा, पंचायत समित्या अधिनियम १९६१ (सन १९६२) चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५ च्या कलम २७४ पोटकलम २ खंड ३९ अन्वये प्रधान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन, ग्रामविकास विभागाने शालेय शिक्षण विभागाच्या समहतीने सेवाप्रवेश तयार केलेले आहेत. या सेवाप्रवेश नियमानूसार राज्यातील जिल्हा परिषद शिक्षकांची नियुक्ती जिल्हा परिषदांच्या शाळांवर केली जाते.

४. सद्यस्थितीत सेवाप्रवेश नियमानूसार प्राथमिक शिक्षकांची निवड करताना, माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परिक्षा किंवा लोकशाळा परिक्षा किंवा राज्य शासनाने मान्यता दिलेली कोणतीही इतर परिक्षा उत्तीर्ण झाल्या असतील, आणि प्राथमिक शाळा प्रमाणपत्र परिक्षा किंवा तुल्य परिक्षा उत्तीर्ण ही अर्हता धारण केलेल्या उमेदवाराची प्राथमिक शिक्षक म्हणून नियुक्ती केली जाते. शालेय शिक्षण विभागाकडून राज्यात केंद्र शासनाचा बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ अस्तित्वात आल्यानंतर राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परिषद (एन.सी.टी.ई) यांनी इयत्ता ६ वी ते इयत्ता ८ वी या वर्गांना शिकविण्याऱ्या शिक्षकांच्या पात्रतेमध्ये बदल करुन, आता, पदवीधर शिक्षक नियुक्त करण्याचा धोरणात्मक निर्णय घेतलेला आहे.

यानूसार उच्च प्राथमिक स्तरावर म्हणजे ६ वी ते ८ वी करिता विज्ञान, भाषा आणि समाजशास्त्र या विषय संवर्गातील प्रत्येकी किमान एक याप्रमाणे खालील प्रशिक्षित पदवीधर अर्हता धारक शिक्षकांच्या नियुक्त्या करण्यात याव्यात, असे निर्देश दिलेले आहेत.

अ) विज्ञान विषय संवर्ग :- गणित/विज्ञान/अभियांत्रिकी

आ) भाषा विषय संवर्ग :- मराठी/इंग्रजी/हिंदी/उर्दू इत्यादी.

इ) सामाजिक शास्त्र विषय संवर्ग :- इतिहास/भूगोल.

५. असे विषय शिक्षक निवडताना, प्रचलित सेवाप्रवेश नियमांनूसार व शालेय शिक्षण विभागाने वेळोवेळी घेतलेल्या धोरणात्मक निर्णयानूसार ६ वी ते ८ वी या इयत्तेकरिता विद्यार्थ्याच्या पटसंख्येनिहाय नेमके किती पदवीधर शिक्षक आवश्यक आहेत, याबाबत शालेय शिक्षण विभागाने धोरण निश्चित केलेले आहे. त्यामुळे प्रत्येक जिल्हा परिषदांकडे किती विषयनिहाय पदवीधर शिक्षक कार्यरत आहेत, व किती विषयनिहाय पदवीधर शिक्षकांची आवश्यकता आहे, याबाबतची आकडेवारी सर्व जिल्हा परिषदांकडे सद्यस्थितीत उपलब्ध आहे.

६. वास्तविकत: राज्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षकांच्या एकूण संख्येमधुनच जे शिक्षक, पदवीधर शिक्षकांची अर्हता धारण करित आहेत, अशा शिक्षकांना पदवीधर पदाची वेतनश्रेणी देवून, त्यांना पदविधर शिक्षक म्हणून नेमणूक दिली जाते. दोन्हीही म्हणजेच प्राथमिक शिक्षक व पदवीधर शिक्षक या दोन्ही पदांची एकच बिंदुनामावली जिल्हा परिषदांकडे आहे. मागिल ७ ते ८ वर्षापासून जिल्हा परिषद शिक्षकांची भरती झालेली नाही. उपलब्ध प्राथमिक शिक्षकांमधूनच काही शिक्षकांना पदविधर शिक्षक म्हणुन वेतनश्रेणी दिली आहे. शालेय शिक्षण विभागाच्या दिनांक १३ ऑक्टोंबर, २०१६ च्या शासन निर्णयानुसार अशी वेतनश्रेणी पदवीधर शिक्षकांमधील ६ वी ते ८ वी मधील विद्यार्थ्यांना शिकविणाऱ्या एकुण शिक्षकांपैकी १/३ शिक्षकांना दिली जाते. मुळातच, प्राथमिक शिक्षकांची निवड ही त्यांच्या माध्यमिक वा १२ वी उत्तीर्ण तसेच D.Ted या शैक्षणिक अर्हतेवर केली जात असल्याने, मोठया प्रमाणात पदवीधर शिक्षकांची कमतरता निर्माण झालेली आहे. तात्पुरती व्यवस्था म्हणून, काही विज्ञान विषय घेवून, काही १२ वी उत्तीर्ण असलेल्या शिक्षकांना ५ वर्षात मुक्त विद्यापिठाची पदवी प्राप्त करण्याच्या अटीवर या शिक्षकांना पदवीधर शिक्षकांच्या पदावर पदस्थापना दिली जाते. अशा पध्दतीने देखील पदवीधर शिक्षकांच्या नियुक्त्या केल्या जातात. मात्र तरी देखील विज्ञान, भाषा व समाजशास्त्र या विषयाची पदवी असलेले शिक्षक, उपलब्ध प्राथमिक शिक्षकांमधून मिळत नाही. विशेषत: विज्ञान विषयाच्या शिक्षकांची मोठया प्रमाणात कमतरता आहे.

७. वरील परिच्छेदात नमूद केलेली वस्तुस्थिती पाहता, जिल्हा परिषदेतील शाळेतील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण उपलब्ध करुन देणे ही शासनाची प्राथमिक जबाबदारी आहे. आज, कार्यरत असलेल्या प्राथमिक शिक्षकांमधून जिल्हा परिषदेतील शाळांना पदवीधर शिक्षक उपलब्ध होत नाही. विशेषत: गणित व विज्ञान या

विषयाच्या पदवीधर शिक्षकांची पदे मोठया प्रमाणात रिक्त आहेत. त्यामुळे जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होवू शकते. विद्यार्थ्यांना तज्ञ शिक्षकांकडून दर्जेदार शिक्षण मिळणे आवश्यक आहे. गेल्या ७, ८ वर्षापासून राज्यभरात सुमारे २३४५ पदवीधर शिक्षकांच्या जागा रिक्त आहेत. त्यातही विज्ञान विषय संवर्ग (गणित/विज्ञान/अभियांत्रिकी) २२८७ जागा रिक्त आहेत.

शासन परिपत्रक :-

उपरोक्त नमूद वस्तुस्थितीमुळे जिल्हा परिषद शिक्षकांची भरती करताना, खालील बाबी विचारात घेवून, शिक्षकांची भरती करण्यात यावी -

१) एकुण रिक्त पदांच्या मर्यादेत पदवीधर शिक्षकांची निव्वळ रिक्त पदे विचारात घेवून, विषयनिहाय रिक्त पदांची जी संख्या असेल तितक्या विषयनिहाय पदवीधर उमेदवारांची प्राथमिक शिक्षक संवर्गात प्रचलित नियमाप्रमाणे नियुक्ती देण्यात यावी.
२) कोणत्याही परिस्थितीत अशी पदभरती करताना, पदवीधर शिक्षकांच्या निश्चित केलेल्या पदसंख्येपेक्षा अधिकची पदभरती होणार नाही, याची दक्षता घ्यावी.
३) पदवीधर शिक्षकांच्या पदावर, प्राथमिक शिक्षकांना नियुक्ती देताना शालेय शिक्षण विभागाच्या दिनांक १३ ऑक्टोबर, २०१६ च्या शासन निर्णयानुसार कार्यवाही करण्यात यावी.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक 201902251759550720 असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Priyadarshan S Kamble

Digitally signed by Priyadarshan S Kamble
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Rural Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=f18890edb030995db4323c71a3bdecddde94daa5425bbe713b2e2a5b7d6fa779, cn=Priyadarshan S Kamble
Date: 2019.02.26 12:48:00 +05'30'

(प्रियदर्शन.शं.कांबळे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१) मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन मलबार हिल, मुंबई.
२) मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव

३) मा.मंत्री/मा.राज्यमंत्री ग्रामविकास, महाराष्ट्र राज्य यांचे खाजगी सचिव
४) मा.विरोधी पक्षनेता, विधानसभा/विधानपरिषद महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
५) सर्व सन्माननीय विधानसभा सदस्य/विधानपरिषद सदस्य, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
६) मा. मुख्य सचिव यांचे उपसचिव, मंत्रालय, मुंबई
७) सर्व अपरमुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग
८) सर्व विभागीय आयुक्त
९) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
१०) उपायुक्त (आस्थापना) विभागीय आयुक्त कार्यालये (सर्व विभाग)
११) माहिती व जनसंपर्क संचालनालय यांना प्रसिध्दीसाठी अग्रेषित.
१२) सर्व कार्यासने, ग्रामविकास विभाग,
१३) निवड नस्ती कार्या क्र.आस्था-१४, ग्रामविकास विभाग, मुंबई-३२